नमुना

जाहिरात

उमेद –महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान ,जिल्हा परिषद,पुणे यांच्या माध्यमातून खालील प्रमाणे नमूद पदासाठी मानधन तत्वावर प्रभाग संघाच्या अंतर्गट निवड करण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अनु क्र | तालुका | प्रभाग संघ व्यवस्थापक पद भरती संख्या | पद (Integrated Farming Cluster)IFC Block Anchor भरती संख्या | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|
| 1 | आंबेगाव | 2 | 1 | 1) प्रभाग संघ व्यवस्थापक --- सर्व आवश्यक पात्रतेसह संबधित प्रभाग संघ्याच्या कार्यक्षेत्रात तिलच असावी. |
| 2 | बारामती | 1 | - | 2) Block Anchor हा सर्व आवश्यक पात्रतेसह त्याच तालुक्यातीलच असावा/असावी |
| 3 | भोर | 1 | - | |
| 4 | दौंड | 1 | - | |
| 5 | जुन्नर | 2 | 1 | |
| 6 | मावळ | 1 | - | |
| 7 | मुळशी | 1 | 1 | |
| 8 | वेल्हा | 1 | 1 | |
| | एकूण | **10** | **4** | |

अधिक सविस्तर माहितीसाठी **WWW.Punezp.gov.in** या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. सदर जाहिरात मध्ये बद्दल करण्याचे अधिकार मा.जिल्हा अभियान संचालक,म.रा.ग्रा.जि.अ तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,पुणे यांनी राखून ठेवला आहे.

अर्ज करण्याचा पत्ता:- गट विकास अधिकारी,पंचायत सामिती,(संबधित )जि.पुणे

अर्ज करण्याचा कालावधी :- दि . 05 डिसेंबर 2025 रोजी साय. 5.00 वाजेपर्यंत

-स्वाक्षरीत-

जिल्हा अभियान संचालक,

म.रा.ग्रा.जी.अ तथा ,

मुख्य कार्यकारी अधिकारी,

जिल्हा परिषद,पुणे

1)प्रभाग संघ व्यवस्थापक पद ज्या प्रभागामध्ये प्रभाग संघ व्यवस्थापक निवड त्या प्रभाग संघाची यादी खालील प्रमाणे

| अ.क्र | तालुक्याचे नाव | प्रभागाचे नाव | आदर्श प्रभाग संघाचे नाव | प्रभाग संघ व्यवस्थापक भरती संख्या |
|---|---|---|---|---|
| 1 | आंबेगाव | घोडेगाव | भीमा शंकर महिला प्रभाग संघ | 2 |
| | | बोर घर-शिनोली | जन जागृती महिला प्रभाग संघ | |
| 2 | बारामती | डोलेवाडी | पारदर्शक महिला प्रभाग संघ | 1 |
| 3 | भोर | वेळू -भोंगवली | राजमुद्रा महिला प्रभाग संघ | 1 |
| 4 | दौंड | राहू -खामगाव | हिंदवी महिला प्रभाग संघ | 1 |
| 5 | जुन्नर | आळे पिंपळवंडी | शिवतेज महिला प्रभाग संघ | 2 |
| | | ओतूर | शिवसृष्टी महिला प्रभाग संघ | |
| 6 | मावळ | टाकवे -वडेश्वर | जिजाऊमहिला प्रभाग संघ | 1 |
| 7 | मुळशी | मान हिंजवडी | सखी महिला प्रभाग संघ | 1 |
| 8 | वेल्हा | विंझर -कुरण खुर्द | स्वराज्य महिला प्रभाग संघ | 1 |
| | एकूण | | | 10 |

2)एकात्मिक शेती विकास प्रकल्प अंतर्गत Block Anchor पद भरती करिता शासनाकडील सूचनानुसार पुणे जिल्ह्यातील खालील प्रमाणे तालुके (मार्गदर्शक सूचना 2 मधील मुद्दा क्र 7.2 संपूर्ण वाचा)

| अनु क्र | तालुका | IFC प्रभाग संघाचे नाव | Block Anchor (प्रति तालुका एक) |
|---|---|---|---|
| 1 | आंबेगाव | क्रांती महिला प्रभाग संघ | 1 |
| | | जनजागृती महिला प्रभाग संघ | |
| | | भीमा शंकर महिला प्रभाग संघ | |
| 2 | जुन्नर | मायभूमी महिला प्रभाग संघ | 1 |
| | | सक्षम महिला प्रभाग संघ | |
| | | शिवश्रृष्टी महिला प्रभाग संघ | |
| 3 | मुळशी | प्रगती महिला प्रभाग संघ | 1 |
| | | शिवज्ञा महिला प्रभाग संघ | |
| | | वसुंधरा महिला प्रभाग संघ | |
| 4 | वेल्हा | स्वराज्य महिला प्रभाग संघ | 1 |
| | | राजगड महिला प्रभाग संघ | |
| | | एकूण | 4 |

# 'उमेद' - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानअंतर्गत कार्यरत आदर्श प्रभागसंघांसाठी प्रभागसंघ व्यवस्थापक (CLF Manager) पदभरतीकरिता सुधारित मार्गदर्शक सूचना

अनुक्रमणिका


प्रस्तावना........................................................................................2

- ❖ प्रभागसंघ व्यवस्थापक पदाकरिता पात्रता व निकष........................................3
- ❖ प्रभागसंघ व्यवस्थापकाच्या जबाबदाऱ्या....................................................4
- ❖ मानधन व भत्ते तपशील..............................................................................5
- ❖ प्रभागसंघ व्यवस्थापक निवड समित्यांची रचना व जबाबदारी..............................6
- ❖ प्रभागसंघ व्यवस्थापक निवड प्रक्रियेचे नियोजन..............................................7
- ❖ प्रभागसंघ व्यवस्थापक निवड प्रक्रिया जाहिरात प्रसिद्धी पद्धती...............................8
- ❖ प्रभागसंघ व्यवस्थापक (CLF Manager) पदभरती प्रक्रियेचे नियोजित वेळापत्रक.............9
- ❖ निवड प्रक्रिया / पद्धती..............................................................................10
- ❖ नमुना प्रपत्र:
  - ➢ प्रभागसंघ व्यवस्थापक (CLF Manager) पदाकरिता जाहिरात नमुना...........................12
  - ➢ प्रभागसंघ व्यवस्थापक (CLF Manager) पदाकरिता अर्ज नमुना...............................13
  - ➢ प्रभागसंघ व्यवस्थापक (CLF Manager) पदाकरिता वृत्तपत्र जाहिरात नमुना.................16
  - ➢ तालुका अभियान व्यवस्थापन कक्षाने प्रभागसंघास द्यावयाचा पत्र नमुना.......................17
  - ➢ प्रभागसंघाने ग्रामसंघास द्यावयाचा पत्र नमुना..................................................18

## प्रभागसंघ व्यवस्थापक (CLF Manager) पदभरतीकरिता सुधारित मार्गदर्शक सूचना

**प्रस्तावना**

ग्रामीण भागातील दारिद्र्य निर्मुलन करण्यासाठी 'उमेद'-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान कार्यरत असून ३४ जिल्ह्यातील ३५१ तालुक्यांमध्ये Intensive कार्यपद्धतीनुसार अभियानाची अंमलबजावणी सुरु आहे. 'उमेद' अभियानामध्ये गरीब - अतिगरीब कुटुंबांतील महिलांचे स्वयंसहाय्यता समूह, ग्रामसंघ व प्रभागसंघ अशी त्रिस्तरीय संस्थीय संरचना तयार करण्यात आलेली आहे. यामध्ये गावपातळीवर स्वयंसहाय्यता समूह व ग्रामसंघ ह्या दोन संस्था कार्यरत असून प्रभागस्तरावर प्रभागसंघाची स्थापना करण्यात आलेली आहे.

यामध्ये त्या प्रभागातील किमान २००-२५० स्वयंसहाय्यता समूहातील किमान २५०० ते ३००० कुटुंबांच्या सामाजिक, आर्थिक विकासासोबत शाश्वत उपजीविकेच्या साधनांच्या निर्मितीसाठी प्रभागसंघ ह्या संस्थेची बांधणी करण्यात आलेली आहे. प्रभागसंघ हे स्वयंसहाय्यता समूह व ग्रामसंघातील सदस्यांचे प्रतीनिधीत्व करतात. त्यामुळे या संस्थेतील कार्यकारणीने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयांची अंमलबजावणी करण्यासाठी तसेच प्रभागसंघामध्ये प्रशासकीय व दैनंदिन कामकाजाचे नियोजन करण्यासाठी **प्रभागसंघ व्यवस्थापक** (CLF Manager) या पदाची आवश्यकता आहे.

यानुसार सन २०२४-२५ च्या NRLM मार्गदर्शक सूचनान्वये प्रभागसंघ व्यवस्थापकांची निवड करण्याचे निर्देश असून, त्यानुसार आदर्श प्रभागसंघ उपक्रमाअंतर्गत कार्यरत प्रभागसंघांमध्ये प्रभागसंघ व्यवस्थापक (CLF Manager) या पदाची पदभरती करणे आवश्यक आहे. सदर मनुष्यबळ हे प्रभागसंघाचे स्वंतत्र कर्मचारी राहणार आहे. प्रभागसंघ व्यवस्थापक प्रभागसंघाचे कामकाज पाहण्याकरिता प्रभागसंघाचा स्वतंत्र कर्मचारी म्हणून काम करणार असून या प्रभागसंघ व्यवस्थापकांच्या कामकाजाचे नियंत्रण संबंधित प्रभागसंघाकडे राहील. त्यांच्या कामाचा आढावा प्रभागसंघ कार्यकारी समितीच्या मासिक बैठकीत घेऊन त्यानुसार केलेल्या कामाची पूर्तता लक्षात घेऊन प्रभागसंघ व्यवस्थापकास मानधन अदा करण्यात येणार आहे.

यान्वये सन २०२४-२५ मध्ये सर्व जिल्ह्यातील आदर्श प्रभागसंघांमध्ये (सद्यस्थितीत प्रभागसंघ व्यवस्थापक पदभरती न केलेल्या/प्रभागसंघ व्यवस्थापक पद रिक्त आहे अशा आदर्श प्रभागसंघांमध्ये) प्रभागसंघ व्यवस्थापकांची नियुक्ती करावयाची आहे. त्यानुसार संबंधित आदर्श प्रभागसंघांकरिता प्रभागसंघ व्यवस्थापकांची निवड प्रक्रिया ही संबंधित प्रभागसंघांच्यावतीने 'उमेद' जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्षाद्वारे माहे सप्टेंबर २०२४ पर्यंत पूर्ण करावयाची आहे. सन २०१७-१८ मध्ये प्रभाग संघ व्यवस्थापक पदभरतीच्या मार्गदर्शक सूचना वितरीत करण्यात आलेल्या होत्या, त्यानुसार सन २०२४-२५ मधील प्रभागसंघ व्यवस्थापक पदभरतीकरिता सुधारित मार्गदर्शक सूचना पुढीलप्रमाणे आहे.

## ❖ प्रभागसंघ व्यवस्थापक पदाकरिता पात्रता व निकष

१. अर्जदार महिला 'उमेद' स्वयंसहाय्यता समूहाची सदस्य असावी.

२. कोणत्याही शाखेची पदवी परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

३. वय किमान २२ वर्ष ते कमाल ४० वर्ष असावे. (वय मोजताना ज्या महिन्यात भरतीप्रक्रिया करण्यात येईल त्या महिन्याची पहिली तारीख गृहीत धरावी.)

४. 'उमेद' अभियानांतर्गत गटाचा हिशोबनीस किंवा ग्रामसंघ/प्रभागसंघ लेखापाल किंवा समुदायस्तरीय लेखापरिक्षक किंवा प्रेरिका किंवा वर्धिनी किंवा वरिष्ठ वर्धिनी किंवा बँक सखी किंवा आर्थिक साक्षरता सखी किंवा पशु सखी किंवा कृषी सखी किंवा मत्स्य सखी किंवा वन सखी किंवा मास्टर कृषी सखी किंवा कृषी उद्योग सखी किंवा कृती संगम सखी/CTC किंवा कृषी व्यवस्थापक किंवा पशु व्यवस्थापक किंवा मत्स्य व्यवस्थापक किंवा BDSP किंवा FL CRP इ. ('उमेद' अंतर्गत सर्व प्रकारच्या समुदाय संसाधन व्यक्ती) म्हणून काम करण्याचा किमान ३ वर्षाचा अनुभव असणे बंधनकारक आहे.

५. उमेदवार ज्या प्रभागासाठी अर्ज करणार आहे त्या प्रभागातील मुळची रहिवासी असणे आवश्यक आहे.

६. स्थानिक भाषेवर प्रभुत्व असणारी तसेच इंग्रजी, हिंदी भाषेमध्ये लिहिण्यास आणि वाचण्यास सक्षम असावी.

७. संगणकाचे ज्ञान असल्यास प्राधान्य देण्यात येईल. याकरिता संगणक प्रशिक्षणाचे प्रमाणपत्र सोबत जोडावे.

८. उत्तम सुसंवादी, नेतृत्व गुण असलेली व गरीब कुटुंबांच्या प्रश्नावर संवेदनशीलतेने काम करणारी असावी.

९. प्रभागसंघाचे कार्यकारी समिती सदस्य (EC), पदाधिकारी (OB) यांच्या कुटुंबातील नसावी.

१०. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये (PRI) सदस्य नसावी.

११. अंगणवाडी सेविका, मदतनीस, आशा कार्यकर्ती म्हणून कार्यरत नसावी. कोणत्याही शासकीय संस्था/स्वयंसेवी संस्था (NGO) मध्ये सेवा देणारी तसेच स्था.स्व.सं.सदस्य/ स्था.स्व.सं. पदाधिकारी इ. म्हणून कार्यरत नसावी.

१२. स्वत:चे गाव सोडून नेमून दिलेल्या प्रभागातील गावांमध्ये प्रवास करून क्षेत्रकार्य करण्याची तसेच बाहेर गावी प्रशिक्षण/कार्यशाळा इ. करिता उपस्थित राहण्याची तयारी असणे आवश्यक आहे.

१३. ज्या गट व ग्रामसंघाची सदस्य आहे, तो गट व ग्रामसंघ A किंवा B श्रेणीतील असणे आवश्यक आहे.

१४. वंचित कुटुंबांतील सदस्य, विधवा, परितक्त्या, अ.जा., अ.ज., दिव्यांग, आदिम जाती/जमाती, एसइबीसी इ. प्रवर्गातील असल्यास प्राधान्य देण्यात येईल.

❖ **प्रभागसंघ व्यवस्थापकाच्या जबाबदाऱ्या**

१. उद्दिष्टे साध्य करण्यासाठी अर्थसंकल्पीय खर्च, माहिती व्यवस्थापित करणे, अहवाल तयार करणे, तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष, सरकारी विभाग, व्यवस्थापकीय कर्मचारी आणि प्रभागसंघाच्या सुरळीत कामकाजासाठी अहवाल देणे.

२. यशोगाथा, अचूक अहवाललेखन आणि दस्तऐवजीकरण करणे.

३. प्रभागसंघाची कार्ये पार पाडण्यासाठी पदाधिकारी आणि कार्यकारी समिती सदस्य यांना सहकार्य करणे.

४. प्रभागसंघ आणि प्रभागसंघ सदस्यांना अभियानाच्या विविध विषयांची आणि इतर उपक्रमासंबंधित माहिती सादर करणे.

५. कम्युनिटी केडरचे प्रशिक्षण, कामकाज देखरेख, मानधन व एकूण व्यवस्थापनाचे काम करणे.

६. प्रभागसंघ लेखापाल, एमआयएस असिस्टंट, सुलभकर्ते आणि इतर प्रभागसंघस्तरीय कर्मचाऱ्यांच्या कामाचे व्यवस्थापन व सनियंत्रण करणे.

७. प्रभागसंघाने सोपवलेली अन्य कामे करणे.

८. देयक अदा करण्यापूर्वी सर्व देयकांची पडताळणी करून साक्षांकित/स्वाक्षरी करणे.

९. प्रभागसंघाच्या सक्षमीकरणासाठी धोरणे आणि दिशा ठरवणे.

१०. प्रभागसंघाचा दृष्टीकोन विकसित करण्यासाठी, वार्षिक कृती आराखडा- व्यवसाय विकास आराखडा, अंदाजपत्रक तयार करण्यासाठी कार्यकारी समितीच्या कामामध्ये महत्त्वाचे योगदान देणे.

११. प्रभागसंघ संस्था नोंदणीसाठी कागदपत्रे तयार करणे आणि संपूर्ण प्रक्रियेचा पाठपुरावा करणे.

१२. वार्षिक अहवाल तयार करणे व वैधानिक लेखापरीक्षण अहवालासहित कार्यकारी समिती, पदाधिकारी यांजकडे सादर करणे. तसेच वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे (AGM) मंजुरीसाठी ठेवणे. प्रभागसंघाच्या वैधानिक पूर्तता (Statutory Compliance) विहित वेळेत पूर्ण करणे.

१३. आर्थिक व्यवस्थापन, मनुष्यबळ व्यवस्थापन संबंधी पद्धती व प्रक्रिया निश्चित करून त्याची अंमलबजावणी करणे. (FM, CBO-HR धोरणानुसार)

१४. क्षमता बांधणी करता नियोजन करणे आणि आवश्यकतेनुसार समुदायस्तरीय संस्थांचे पदाधिकारी (SHG, VO आणि CLF), उप-समिती सदस्य, कर्मचारी आणि कम्युनिटी केडर यांच्याकरिता प्रशिक्षण आयोजित करणे.

१५. प्रभागसंघ कार्यकारी समिती, प्रातिनिधिक सर्वसाधारण समिती, वार्षिक सर्वसाधारण समिती यांच्या सभा तसेच विशेष सभांचे (EC/GB/RGB/BoD/AGM/Spl) आयोजन करणे.

१६. प्रभागसंघाअंतर्गत ग्रामसंघ, समूहाचे नियमित श्रेणीकरण व अंतर्गत तसेच वैधानिक लेखापरिक्षण विहित वेळेत पूर्ण करून घेणे.

१७. सामुदायिक खरेदी प्रक्रिया प्रभावीपणे राबविले जात असलेबाबत दक्षता घेणे.

१८. "समुदाय तक्रार निवारण" यंत्रणेचे सुलभीकरण करणे.

## ❖ मानधन व भत्ते तपशील

| अ.क्र. | तपशील | मानधन/ भत्ते |
|---|---|---|
| १ | CLF Manager या पदावर काम करणाऱ्या महिलेचे मानधन | ६००० |
| २ | प्रवास खर्च व इतर भत्ते मिळून एकत्रित भत्ता | १५०० |
| | एकूण मानधन (प्रती महिना) | ७५०० |

## ❖ मानधन वितरण प्रणाली

| अ. क्र. | वर्ष (नियुक्तीपासून) | मानधन वितरण (वर्षनिहाय योगदान / जबाबदारी) | | शेरा |
|---|---|---|---|---|
| | | उमेद अभियान | संबधित प्रभागसंघ | |
| १ | प्रथम वर्ष | १००% | ०% | (नियुक्तीपासून १२ महिने म्हणजेच १ वर्ष कालावधी) यानुसार प्रतिवर्षनिहाय मानधन वितरण पद्धतीचा अवलंब करावा. |
| २ | द्वितीय वर्ष | ७५% | २५% | |
| ३ | तृतीय वर्ष | ५०% | ५०% | |
| ४ | चतुर्थ वर्ष | २५% | ७५% | |
| ५ | पाचवे वर्ष | ०% | १००% | |
| आदर्श प्रभागसंघांना अभियानाद्वारे VGF निधी वितरित करण्यात आलेला आहे अशा प्रभागसंपांमधील प्रभागसंघ व्यवस्थापकांच्या मानधनाकरिता जिल्हास्तरावरून निधी अनुज्ञेय राहणार नाही. VGF निधीमध्ये प्रभागसंघ व्यवस्थापकाच्या मानधनाकरिता तरतूद करण्यात आलेली आहे. | | | | |

## ❖ मानधन निधीबाबत सूचना

१. ज्या आदर्श प्रभागसंघांना अभियानाद्वारे सद्यस्थितीत VGF निधी वितरित केलेला नाही अशा आदर्श प्रभागसंघांमधील प्रभागसंघ व्यवस्थापकांच्या मानधनाकरिताचा निधी NRLM B2 या मुळ लेखाशीर्षकातील B2.2.2 या उपलेखाशीर्षकामध्ये उपलब्ध निधीतून अदा करावयाचा आहे. संबंधित आदर्श प्रभागसंघांना VGF निधी वितरित केल्यावर प्रभागसंघ व्यवस्थापकांच्या मानधनाकरिताचा निधी जिल्हास्तरावरून अनुज्ञेय राहणार नाही.

२. सद्यस्थितीत ज्या प्रभागसंघांमध्ये (आदर्श प्रभागसंघांव्यतिरिक्त) प्रभागसंघ व्यवस्थापक कार्यरत आहेत अशा सर्व प्रभागसंघांना वर नमूद मानधन वितरण प्रणालीनुसार मानधन निधी अनुज्ञेय राहील.

३. प्रभागसंघाचे उत्पन्न लक्षात घेऊन प्रभागसंघ कार्यकारी समितीच्या मान्यतेने प्रभागसंघ व्यवस्थापकांच्या मानधनामध्ये त्यांच्या स्व-उत्पन्नातून प्रभागसंघ प्रतिवर्ष ५% वाढ करू शकेल.

## ❖ प्रभागसंघ व्यवस्थापक निवड प्रक्रियेकरिता समित्यांची रचना व जबाबदारी

प्रभागसंघ व्यवस्थापक पदभरती प्रक्रिया राबविण्यासाठी जिल्हा व तालुकास्तरीय निवडसमित्यांची स्थापना करावयाची असून सदर समित्यांची रचना व जबाबदारी पुढीलप्रमाणे :

| अ.क्र. | समिती | सदस्य |
|---|---|---|
| १ | तालुका स्तरीय निवड समिती (प्रति तालुका १) | १. तालुका अभियान व्यवस्थापक ( अध्यक्ष)<br>२. तालुका व्यवस्थापक FI - (सदस्य)<br>३. तालुका व्यवस्थापक MIS and M&E - (सदस्य)<br>४. २ प्रभागसंघांचे २ पदाधिकारी- (सदस्य)<br>५. तालुका व्यवस्थापक IB-CB – (सदस्य सचिव) |
| २ | जिल्हा स्तरीय निवड समिती | १. प्रकल्प संचालक - जि.ग्रा.वि.यं. – (अध्यक्ष)<br>२. जिल्हा अभियान व्यवस्थापक – (सदस्य)<br>३. जिल्हा व्यवस्थापक SIIB-CB – (सदस्य)<br>४. जिल्हा व्यवस्थापक FI – (सदस्य)<br>५. जिल्हा व्यवस्थापक MIS and M&E – (सदस्य)<br>६. २ प्रभागसंघांचे २ पदाधिकारी – (सदस्य)<br>७. जिल्हा व्यवस्थापक संपादणूक तथा कार्यालय अधिक्षक – (सदस्य सचिव) |

### ➢ तालुका व जिल्हास्तरीय निवड समितीची जबाबदारी

| समिती | जबाबदारी |
|---|---|
| तालुका स्तरीय निवड समिती | • प्रभागसंघ व्यवस्थापक पदभरतीची जाहिरात पंचायत समिती, 'उमेद' तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष कार्यालयातील नोटीस बोर्डमध्ये लावणे.<br>• जाहिरात सर्व प्रभागसंघ, ग्रामसंघ व गटांपर्यंत पोहोच करणे.<br>• आलेल्या सर्व अर्जांची तपासणी करून पात्र अर्जदारांची यादी तयार करणे.<br>• पुढील निवड प्रक्रियेस पात्र अर्जांची यादी व अर्ज सर्व तपशिलांसह प्रमाणित करून जि.अ.व्य.क. येथे जिल्हास्तरीय निवड समितीकडे पाठविणे.<br>• जिल्हास्तरावरील पडताळणीअंति निवड प्रक्रीयेसाठी पात्र ठरलेल्या अर्जदारांना लेखी परीक्षेची सविस्तर माहिती कळविणे.<br>• लेखी परीक्षेच्या प्रक्रियेकरिता जिल्हास्तरीय निवड समितीद्वारे दिलेल्या जबाबदाऱ्या पार पाडणे.<br>• संपूर्ण निवड प्रक्रीयेदरम्यान जि.अ.व्य.क.-जिल्हास्तरीय निवड समितीद्वारे दिल्या जाणाऱ्या सूचनांनुसार कामकाज / कार्यवाही करणे. |
| जिल्हा स्तरीय निवड समिती | • प्रभागसंघ व्यवस्थापक पदभरतीची जाहिरात स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध करणे.<br>• प्रभागसंघ व्यवस्थापक पदभरतीची जाहिरात जिल्हा परिषद, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, 'उमेद' जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष कार्यालयातील नोटीस बोर्डमध्ये लावणे.<br>• तालुका निवड समितीकडून आलेल्या अर्जांची फेर तपासणी करणे व पुढील निवड प्रक्रियेस पात्र अर्जदारांची यादी अंतिम करून सर्व तालुका अभियान |

| समिती | जबाबदारी |
|---|---|
| | व्यवस्थापन कक्षास कळविणे.<br>• लेखी परीक्षेचा पेपर मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. यांचेद्वारा तयार करून घेणे.<br>• लेखी परीक्षा तारीख अंतिम करून ती सर्व तालुका अभियान व्यवस्थापन कक्षास कळविणे.<br>• लेखी परीक्षा - बैठक व्यवस्था, पेपर तपासणी, निकाल इ. संबंधित नियोजन व कार्यवाही करणे.<br>• जिल्हा अभियान कक्षातील अधिकारी व कर्मचारी यांना प्रक्रियेबाबत सर्व सूचना देणे व संपूर्ण निवड प्रक्रियेचे सनियंत्रण करणे.<br>• उमेदवरांच्या मुलाखतीसाठी प्रकल्प संचालक यांचे अध्यक्षतेखाली Pannel सदस्य म्हणून जबाबदारी पार पाडणे.<br>• निकाल तयार करून अंतिम निवड यादी प्रसिद्ध करणे.<br>• अंतिम निवड यादी ता.अ.व्य.क. व संबधित प्रभागसंघाना कळविणे.<br>• संपूर्ण निवड प्रक्रीयेदरम्यान मार्गदर्शक सूचनांनुसार कामकाज/कार्यवाही करणे. |

❖ **प्रभागसंघ व्यवस्थापक निवड प्रक्रिया जाहिरात प्रसिद्धी पद्धती**

१. प्रभागसंघ व्यवस्थापक या पदाकरिता निवड प्रक्रियेचे आयोजन 'उमेद' जिल्हा अभियान संचालक, 'उमेद' - एमएसआरएलएम तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. यांच्या मान्यतेने जिल्हास्तरीय निवड समिती, 'उमेद' - जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष यांनी करावयाचे आहे.

२. प्रभागसंघ व्यवस्थापक निवड प्रक्रियेचे सुनियोजित वेळापत्रक तयार करण्यात यावे.

३. प्रभागसंघ व्यवस्थापक पदभरतीची जाहिरात स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध करावयाची आहे.

४. प्रभागसंघ व्यवस्थापक पदभरतीची जाहिरात जिल्हा परिषद, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, 'उमेद' जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष कार्यालयातील नोटीस बोर्डमध्ये लावण्यात यावी.

५. जिल्हास्तरीय निवड समिती, 'उमेद' - जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष यांनी प्रभागसंघ व्यवस्थापक पदभरतीची जाहिरात तालुकास्तरीय निवड समिती, उमेद - तालुका अभियान व्यवस्थापन कक्षांद्वारे सर्व प्रभागसंघाना वितरीत करावी.

६. सर्व प्रभागसंघानी प्रभागसंघ व्यवस्थापक पदभरतीची जाहिरात आपल्या प्रभाग कार्यक्षेत्रातील सर्व ग्रामसंघांना वितरीत करावी.

७. सर्व ग्रामसंघांनी प्रभागसंघ व्यवस्थापक पदभरतीची जाहिरात 'उमेद' अभियानांतर्गत गटाचा हिशोबनीस किंवा ग्रामसंघ/प्रभागसंघ लेखापाल किंवा समुदायस्तरीय लेखापरिक्षक किंवा प्रेरिका किंवा वर्धिनी किंवा वरिष्ठ वर्धिनी किंवा बँक सखी किंवा आर्थिक साक्षरता सखी किंवा पशु सखी किंवा कृषी सखी किंवा मत्स्य सखी किंवा वन सखी किंवा मास्टर कृषी सखी किंवा कृषी उद्योग सखी किंवा कृती संगम सखी/CTC किंवा कृषी व्यवस्थापक किंवा पशु व्यवस्थापक किंवा मत्स्य व्यवस्थापक किंवा BDSP किंवा FL-CRP इ. ('उमेद' अंतर्गत सर्व प्रकारच्या समुदाय संसाधन व्यक्ती) म्हणून काम करण्याचा किमान ३ वर्षाचा अनुभव असणाऱ्या व्यक्तींना वितरित करावी.

८. प्रभागसंघ व्यवस्थापक पदभरतीची जाहिरात सर्व प्रभागसंघ, ग्रामसंघ, समूह व 'उमेद' अभियानांतर्गत गटाचा हिशोबनीस किंवा ग्रामसंघ/प्रभागसंघ लेखापाल किंवा समुदायस्तरीय लेखापरिक्षक किंवा प्रेरिका किंवा वर्धिनी किंवा वरिष्ठ वर्धिनी किंवा बँक सखी किंवा आर्थिक साक्षरता सखी किंवा पशु सखी किंवा कृषी सखी किंवा मत्स्य सखी किंवा वन सखी किंवा मास्टर कृषी सखी किंवा कृषी उद्योग सखी किंवा कृती संगम सखी/CTC किंवा कृषी व्यवस्थापक किंवा पशु व्यवस्थापक किंवा मत्स्य व्यवस्थापक किंवा BDSP किंवा FL-CRP इ. ('उमेद' अंतर्गत सर्व प्रकारच्या समुदाय संसाधन व्यक्ती) यांना वितरित होण्याकरिता तालुकास्तरीय निवड समिती, 'उमेद'- तालुका अभियान व्यवस्थापन कक्षांनी आवश्यक ते सूक्ष्म नियोजन करावयाचे आहे.

९. अ.क्र. ५ ते ८ नुसार प्रभागसंघ व्यवस्थापक पदभरतीची जाहिरात सर्व संबंधितांना पोहोचण्याकरिता जिल्हास्तरीय निवड समिती, उमेद - जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष यांनी नियमितपणे आवश्यक ते सुलभीकरण व सनियंत्रण करावे.

१०. जाहिरात प्रसिद्धीपासून अर्ज सादर करण्यासाठीची मुदत १५ दिवस इतकी देण्यात यावी.

❖ **निवड प्रक्रिया / पद्धती**

प्रभागसंघ व्यवस्थापक निवड प्रक्रिया ही लेखी परीक्षा व मुलाखतीद्वारे राबवावयाची आहे. सर्व प्रक्रियामध्ये किमान ५०% गुण मिळणे आवश्यक आहे. याबाबतचे विवरण पुढीलप्रमाणे:-

| अ.क्र. | निवड प्रक्रिया टप्पे | मुल्यांकन | किमान आवश्यक गुण (५०%) |
|---|---|---|---|
| १ | लेखी परीक्षा | ७५ | ५०% |
| २ | मुलाखत | ०५ | ५०% |
| एकूण | | ८० | ५०% |

**1. लेखी परीक्षा (७५ गुण):**

सदर परीक्षेमध्ये सर्व ७५ प्रश्न वस्तुनिष्ठ स्वरूपाचे असतील, याबाबतचे विवरण पुढीलप्रमाणे :

| प्रश्नाचे स्वरूप | मराठी व्याकरण | संगणक ज्ञान | गणित | सामान्य ज्ञान | बुद्धिमत्ता | अभियानासंबंधित | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| गुण | ५ | ५ | १० | १० | १५ | ३० | ७५ |

लेखी परीक्षेचा पेपर मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. यांचेद्वारा गोपनीय पद्धतीने तयार करून घ्यावयाचा आहे. सदर लेखीपरीक्षेकरिता ९० मिनिटे वेळ द्यावयाचा आहे. लेखी परीक्षेमध्ये किमान ५०% गुण मिळणे अनिवार्य आहे. किमान ५०% गुण मिळालेल्या उमेदवारांपैकी गुणानुक्रमे प्रथम ७ उमेदवारांना (प्रती आदर्श प्रभागसंघ ७ उमेदवार) मुलाखत प्रक्रियेसाठी आमंत्रित करावयाचे आहे. गुणानुक्रमे समान गुण प्राप्त असणारे उमेदवार असल्यास सदर संख्या परिस्थितीनिहाय अधिक राहू शकेल.

**2. मुलाखत (२५ गुण):**

मुलाखतीकरिता पात्र उमेदवारांच्या मुलखातीमध्ये खालील पद्धतीने गुणांकन करावयाचे आहे.

| शिक्षण (१३ गुण) | अभियानाचा अनुभव (७ गुण) | विषय ज्ञान (२ गुण) | व्यक्तिमत्व (१ गुण) | संवाद कौशल्य व निर्णय क्षमता (२ गुण) |
|---|---|---|---|---|
| (पदवीची टक्केवारी)<br>• ८०.०१% किंवा त्यापेक्षा जास्त - १३ गुण<br>• ७५.०१% ते ८०% - १२ गुण<br>• ७०.०१% ते ७५% - ११ गुण<br>• ६५.०१% ते ७०% - १० गुण<br>• ६०.०१% ते ६५% - ९ गुण<br>• ५५.०१% ते ६०% - ८ गुण<br>• ५०.०१% ते ५५% - ७ गुण<br>• ४५.०१% ते ५०% - ६ गुण<br>• ४०.०१% ते ४५% - ५ गुण<br>• ४०% पेक्षा कमी - ४ गुण | • ८.०१ किंवा त्यापेक्षा जास्त अनुभव - ७ गुण<br>• ७.०१ ते ८ वर्ष अनुभव - ६ गुण<br>• ६.०१ ते ७ वर्ष अनुभव - ५ गुण<br>• ५.०१ ते ६ वर्ष अनुभव - ४ गुण<br>• ४.०१ ते ५ वर्ष अनुभव - ३ गुण<br>• ३.०१ ते ४ वर्ष अनुभव - २ गुण<br>• किमान ३ वर्ष अनुभव - १ गुण | • अभियानाबाबत ज्ञान<br>• उमेदवार करीत असलेल्या कामाबाबत ज्ञान | • आत्मविश्वास<br>• सकारात्मक दृष्टीकोन<br>• वैयक्तिक महत्वाकांक्षा<br>(विविध प्रश्न व चर्चेच्या माध्यमाने मुल्यांकन करून त्या आधारे गुण द्यावे.) | • संवाद कौशल्य<br>• प्रभागसंघ व्यवस्थापकाच्या जबाबदाऱ्या बाबतचे ज्ञान<br>• निर्णय क्षमता<br>(विविध प्रश्न व चर्चेच्या माध्यमाने मुल्यांकन करून त्या आधारे गुण द्यावे.) |

### 3. निकाल जाहीर करणे :

3.1 प्रभागसंघ व्यवस्थापक पदाच्या निवड प्रक्रीयेदरम्यान मुलाखतीअंति जे उमेदवार पात्र ठरतील अशा उमेदवारांची निवड यादी तयार करणे.

3.2 प्रती आदर्श प्रभागसंघ २ उमेदवारांची प्रतीक्षा यादी तयार करणे.

3.3 जिल्हास्तरीय निवड समिती/जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्षाने जाहीर करून सर्व ता.अ.व्य.क. व संबधित सर्व प्रभागसंघांना कळविणे.

3.4 सदर निवड यादी व प्रतीक्षाधिन उमेदवारांची यादी जिल्हास्तरावर जिल्हा परिषद, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, 'उमेद' जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष तसेच तालुकास्तरावर पंचायत समिती, 'उमेद' तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष कार्यालयातील नोटीस बोर्डमध्ये लावणे.

### 4. करारनामा करणे :

4.1 जि.अ.व्य.क. द्वारे प्राप्त अंतिम निवड यादीनुसार संबंधित प्रभागसंघ निवड झालेल्या उमेदवारास रुजू होणेसाठी प्रभागसंघस्तरावर बोलावून घेईल.

4.2 प्रभागसंघाने उमेदवाराचे सर्व मूळ कागदपत्रे संबंधित तालुका अभियान व्यवस्थापक यांच्या उपस्थितीत तपासून सत्यप्रतीमध्ये २ सेट घ्यावयाचे आहेत.

4.3 कागदपत्रे तपासणीअंती रु.१००/- च्या मुद्रांक पेपरवर प्रभागसंघ व प्रभागसंघ व्यवस्थापक यांच्यामध्ये ११ महिन्याचा करारनामा करून संबंधित प्रभागसंघ व्यवस्थापकाना कामावर रुजू करून घ्यावयाचे आहे.

### ❖ सद्यस्थितीत कार्यरत सर्व प्रभागसंघ व्यवस्थापकांबाबत सूचना

➢ प्रभागसंघ व्यवस्थापक पदभरतीबाबत सुधारित मार्गदर्शक सूचनांनुसार निश्चित केलेल्या प्रभागसंघ व्यवस्थापकांच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या, मानधन प्रणाली सद्यस्थितीत कार्यरत सर्व प्रभागसंघ व्यवस्थापकाना लागू राहतील. संबधित जिल्ह्यांनी याबाबत आढावा घेऊन सर्व प्रभागसंघांना याबाबत आवश्यक त्या सूचना द्याव्यात.

(प्रभागसंघ व्यवस्थापक (CLF Manager) पदाकरिता अर्ज नमुना)

प्रभागसंघ व्यवस्थापक (CLF Manager) पदाकरिता अर्ज

(अर्ज भरताना लागू असलेल्या ठिकाणी [✓] अशी खूण करावी.)

प्रति,
मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद तथा
जिल्हा अभियान संचालक,
महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान -----------------

फोटो

विषय: 'प्रभागसंघ व्यवस्थापक' पदाकरिता अर्ज करणेबाबत.

अ. वैयक्तिक माहिती:

| | | |
|---|---|---|
| संपूर्ण नाव | | |
| जन्मतारीख | | |
| वय (वर्ष, महिना, दिवस) (दि.----/----/------ रोजी) | | |
| संवर्ग (अनु.जाती, अनु.जमाती, इ.मा.व., भ.वि.जाती, वि.मा.प्र, एसइबीसी, खुला) | | |
| संपूर्ण पत्ता | | |
| समूहाचे नाव | | |
| समूहाचा स्थापना दिनांक | | |
| समुहाचा NIC कोड | | |
| समूहामध्ये सदस्यत्व स्वीकारल्याचा दिनांक | | |
| अर्जदार गटाची सदस्य झालेपासून गटाच्या एकूण बैठकींची संख्या | | |
| अर्जदार उपस्थित असलेल्या बैठकांची संख्या | | |
| समुह ग्रामसंघाचा सदस्य आहे का? | होय | नाही |
| ग्रामसंघाचे नाव | | |
| ग्रामसंघ प्रभागसंघाचा सदस्य आहे का? | होय | नाही |
| प्रभागसंघाचे नाव | | |
| गट दशसुत्रीचे पालन करतो? | होय | नाही |
| समूहाची शेवटच्या महिन्यातील श्रेणी | | |
| ग्रामसंघाचे नाव | | |
| ग्रामसंघाची शेवटच्या तिमाहीतील श्रेणी | | |
| लिंग | | |
| वैवाहिक स्थिती (विवाहित/अविवाहित/परितक्ता/घटस्पोटीत) | | |
| सध्याचा पत्ता | | |
| संपर्क क्रमांक/मोबाईल नंबर | | |
| ई-मेल आय डी | | |

ब. शैक्षणिक पात्रतेचा तपशील:

१. शैक्षणिक पात्रता (१० वी पासून पुढे)

| शाळा/ महाविद्यालयाचे नाव | बोर्ड/ विद्यापीठाचे नाव | शिक्षण | गुणांची टक्केवारी | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | विषय |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

२. इतर शैक्षणिक पात्रता तपशील:

| अ.क्र. | इतर प्रमाणपत्र अभ्यासक्रम | बोर्ड | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | गुण/श्रेणी |
|---|---|---|---|---|
| १ | MS-CIT किंवा समकक्ष | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |

३. अवगत असलेल्या भाषा: (येत असल्यास ✓ टिक करावे)

| भाषेचे नाव | मराठी | इंग्रजी | हिंदी | इतर |
|---|---|---|---|---|
| वाचता येते | | | | |
| बोलता येते | | | | |
| लिहिता येते | | | | |

क. अर्जदाराने गट / ग्रामसंघ / बँक लिंकेज मधून घेतलेल्या व परतफेड केलेल्या कर्जाचा तपशील:-

| अ. क्र. | कर्जाचा प्रकार | एकूण किती वेळा कर्ज घेतले (संख्या) | एकूण कर्ज रक्कम | परतफेड केलेली रक्कम | परतफेडीची टक्केवारी | शिल्लक कर्ज रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | अंतर्गत कर्ज | | | | | |
| 2 | बँक कर्ज | | | | | |
| 3 | CIF कर्ज | | | | | |
| 4 | VRF कर्ज | | | | | |
| | एकूण | | | | | |

ड. समूह/ग्रामसंघ/प्रभागसंघ स्तरावर समूहाचा हिशोबनीस किंवा ग्रामसंघ/प्रभागसंघ लेखापाल किंवा समुदायस्तरीय लेखापरिक्षक किंवा प्रेरिका किंवा वर्धिनी किंवा वरिष्ठ वर्धिनी किंवा बँक सखी किंवा आर्थिक साक्षरता सखी किंवा पशु सखी किंवा कृषी सखी किंवा मत्स्य सखी किंवा वन सखी किंवा मास्टर कृषी सखी किंवा कृषी उद्योग सखी किंवा कृती संगम सखी/CTC किंवा कृषी व्यवस्थापक किंवा पशु व्यवस्थापक किंवा मत्स्य व्यवस्थापक किंवा BDSP किंवा FL-CRP इ. ('उमेद' अंतर्गत सर्व प्रकारच्या समुदाय संसाधन व्यक्ती) म्हणून म्हणून काम केल्याचा तपशील:

| अ. क्र. | पद | कार्यरत गट/ग्रामसंघ/ प्रभागसंघ/विषय | दि.................. पासून दि.................. पर्यंत | एकूण अनुभव कालावधी (वर्ष,महिने) |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | एकूण | | |

सध्या अभियानात कार्यरत आहात का?- होय / नाही. होय असल्यास कार्यरत पदाचे (Cadre) नाव: ...............................

इ. प्रशिक्षणार्थी म्हणून स्वतः घेतलेल्या प्रशिक्षणांबाबत माहिती :

| अ.क्र | प्रशिक्षण Module | होय/ नाही |
|---|---|---|
| १ | स्वयंसहायता समुह बांधणी प्रशिक्षण (SM1) | |
| २ | आर्थिक साक्षरता प्रशिक्षण (SM2) | |
| ३ | ग्रामसंघ बांधणी प्रशिक्षण (VM1) | |
| ४ | इतर(CRM1,मास्टर ट्रेनर इ.) | |
| | | |
| | | |

ई. वंचितता घटकात मोडत असल्यास (विधवा/निराधार/घटस्फोटीत/एकल/दिव्यांग/इत्यादी) कौटूबिक पार्श्वभूमी/ माहिती:

| |
|---|
| |

उ. अर्जासोबत जोडावयाचे कागदपत्राबाबत सूचनाः-
(अर्जदाराने पुढील कागदपत्रे अर्जासोबत जोडावयाची आहेत.)

१. स्वयंसहाय्यता समूह सदस्यत्वाचे प्रमाणपत्र
२. रहिवासी प्रमाणपत्र
३. जन्म दाखला / शाळा सोडल्याचा दाखला
४. १० वी, १२ वी व पदवीचे गुणपत्रक व पदवी प्रमाणपत्र
५. 'उमेद' अभियानांतर्गत गटाचा हिशोबनीस किंवा ग्रामसंघ/प्रभागसंघ लेखापाल किंवा समुदायस्तरीय लेखापरिक्षक किंवा प्रेरिका किंवा वर्धिनी किंवा वरिष्ठ वर्धिनी किंवा बँक सखी किंवा आर्थिक साक्षरता सखी किंवा पशु सखी किंवा कृषी सखी किंवा मत्स्य सखी किंवा वन सखी किंवा मास्टर कृषी सखी किंवा कृषी उद्योग सखी किंवा कृती संगम सखी/CTC किंवा कृषी व्यवस्थापक किंवा पशु व्यवस्थापक किंवा मत्स्य व्यवस्थापक किंवा BDSP किंवा FL-CRP इ. ('उमेद' अंतर्गत सर्व प्रकारच्या समुदाय संसाधन व्यक्ती) इ. पदावर काम केलेबाबत संबंधित समूह/ ग्रामसंघ/ प्रभागसंघाचे अनुभव प्रमाणपत्र
६. संगणक प्रशिक्षण (MS-CIT / समकक्ष प्रशिक्षण) घेतले असल्यास संबंधित प्रशिक्षण संस्थेचे प्रमाणपत्र

ऊ. जाहीरनामा:

मी ........................................................ असे लिहून देते की, मी माझ्या अर्जात नमूद केलेली माहिती ही परिपूर्ण, सत्य व विश्वासार्ह आहे. मी दिलेली माहिती खोटी आढळल्यास माझा अर्ज कुठल्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल याची मला खात्री आहे. मी अर्ज करण्यास जरी पात्र असले तरी मी प्रभागसंघ व्यवस्थापक निवडसूची करिता पात्र असेलच असे नाही. शिक्षण व पात्रतेनुसार योग्य अर्जदाराचा निवडसुचीत समाविष्ट करण्याचे सर्व अधिकार हे प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा परिषद तथा जिल्हा अभियान सहसंचालक, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, जि. ................ यांचेकडे राखीव आहेत याची मला जाणीव आहे. सदर पद समुदाय संस्थास्तरीय व पूर्णपणे कंत्राटी स्वरूपाचे असून भविष्यात कायमस्वरूपी पद स्थापनेकरिता मला कोणताही हक्क सांगता येणार नाही हे मला मान्य आहे.

उमेदवाराची स्वाक्षरी

अर्ज जमा केल्याचा दिनांक :

ठिकाण:

# NRLM-एकात्मिक शेती प्रभाग (IFC) विकास प्रकल्प

## सेवादाता व समुदाय संसाधन व्यक्ति निवड मार्गदर्शिका

Umed

Maharashtra State Rural Livelihoods Mission

उमेद- महाराष्ट्र राज्य ग्रामीण उपजीविका अभियान

उपजीविका विभाग

५ वा मजला, सिडको भवन (दक्षिण विभाग), सी. बी. डी. बेलापुर ४००६१

# अनुक्रमणिका

१. DAY-NRLM शेती उपजीविका प्रोत्साहन धोरण: ........ 3

२. DAY-NRLM मध्ये एकात्मिक शेती प्रभाग ची संकल्पना: ........ 3

३. प्रकल्पाचे उद्देश ........ 3

४. एकात्मिक शेती प्रभागाचे घटक: ........ 4

५. अंमलबजावणी धोरण ........ 5

५.१ कृतिसंगम: ........ 5

५.२ त्रिपक्षीय नॉन-फायनान्शियल सामंजस्य करार (MoU) करण्यात आला आहे: ........ 5

५.२.१ KVK/ICAR ची IFC प्रकल्प अंमलबजावणीची भूमिका: ........ 6

५.२.२ MSRLM ची भूमिका: ........ 6

५.२.३ Rapid Rural Community Response to COVID-19 (RCRC) ची भूमिका: ........ 6

५.४ प्रभाग स्तरावर उपजीविका उपक्रम वृद्धी व संसाधन सेवा केंद्र (LSC) ........ 7

५.४.१ उपजीविका उपक्रम वृद्धी व संसाधन सेवा केंद्र (LSC) फायदे: ........ 7

५.४.२ उपजीविका उपक्रम वृद्धी व संसाधन सेवा केंद्राचे व्यवस्थापन: ........ 7

६. एकात्मिक शेती प्रभाग च्या मालमत्तेची मालकी आणि प्रशासन ........ 8

७. प्रकल्पाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक मनुष्यबळ रचना: ........ 8

७.१ Senior CRP ........ 8

७.१.१ Senior CRP साठी निवड निकष: ........ 8

७.१.२ वरिष्ठ (Senior) CRP ची भूमिका आणि जबाबदाऱ्या: ........ 9

७.१.३ वरिष्ठ (Senior) CRP मानधन: ........ 9

७.१. ४ वरिष्ठ CRP पदाचे निवड पद्धती: ........ 10

७.१.५ लेखी व तोंडी परीक्षेचे निकष: ........ 10

७.२ IFC Block Anchor: ........ 10

७.२.१ IFC Block Anchor साठी निवड निकष: ........ 10

७.२.२ IFC Block Anchor ची भूमिका आणि जबाबदाऱ्या: ........ 10

७.२.३ IFC Block Anchor (सेवादाता) मानधन: ........ 11

७.२.४ IFC Anchor सेवादाता पदाचे निवड पद्धती: ........ 11

७.२.५ लेखी व तोंडी परीक्षेचे निकष: ........ 11

८. एकात्मिक शेती प्रभाग समुदाय संसाधन व्यक्ति जिल्हा स्तरीय निवड समिती: ........ 12

९. एकात्मिक शेती प्रभाग अंमलबजावणी मूल्यमापन व संनियंत्रण समिति: ........ 12

## १. DAY-NRLM शेती उपजीविका प्रोत्साहन धोरण:

DAY-NRLM च्या माध्यमातून ग्रामीण भागातील गरिबांचा समुदाय स्तरीय संस्था बांधणी व त्यांची क्षमता बांधणी करून त्याच्या माध्यमातून सदस्यांचा शाश्वत विकास घडवून आणले जाते. तसेच स्वयं सहाय्यता समूहातील सदस्यांचे सुरवातीला सद्यस्थितीत चालू असलेले शेती आधारित, बिगरशेती उपजीविका उपक्रमाच्या माध्यमातून उत्पन्न वाढविणेसाठी त्यांना प्रशिक्षण देऊन त्यांची क्षमता बांधणी करून मार्गदर्शन केले जाते. शेती व बिगर शेती आधारित उपक्रमात समाविष्ट असलेल्या स्वयं सहाय्यता समूह सदस्यांना त्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी एकात्मिक शेती प्रभाग विकास प्रकल्प राबविला जात आहे. यामध्ये प्रामुख्याने जवळ-जवळच्या २ ते ३ गावांचे एकत्रित रित्या उपजीविका उपक्रम बळकट करण्यासाठी भौतिक आणि आर्थिक उद्दीष्टे ठेवून मुल्यवर्धन साखळी विकसित करणे, उपजीविका उपक्रम वृद्धी व संसाधन सेवा केंद्र, शेती उपक्रम, पशुधन आधारित उपक्रम यावर भर देण्यात आलेला आहे.

*टीप-यामध्ये प्रभाग ही संकल्पना IFC प्रकल्प अंतर्गत समाविष्ट होणाऱ्या २ ते ३ गावांसाठीच लागू आहे. भौगोलिक परिस्थिती नुसार गावांच्या संखेत वाढ होऊ शकते. यात समाविष्ट असणाऱ्या गावात अभियानाचे सर्व उपक्रम राबवून त्यांची प्रतिकृति उर्वीरत भागात देखील टप्याटप्याने राबविणे हा उद्देश आहे. उपजीविका उपक्रम अंमलबजावणी सदरचे IFC प्रभाग ही उपजीविका उपक्रम अंमलबजावणी साठी आदर्श प्रभाग म्हणून विकसित होणे अपेक्षित आहे. प्रत्येक कुटुंबाकडे वर्षभर नियमित उत्पन्नाचा प्रवाह उपलब्ध करून देण्यासाठी विविध उत्पन्नाचे स्रोत सुनिश्चित करण्याचा प्रयत्न आहे. उत्पादकांना उत्पादन आणि उत्पादकता वाढवण्यासाठी कुशल बनवणे आणि अत्यंत महत्वाचे म्हणजे परवडणाऱ्या दरात कर्ज उपलब्धता सुनिश्चित करणे, बाजारपेठेपर्यंत पोहोचणे आणि सुधारित तंत्रज्ञानाची उपलब्धता ही काही गंभीर आव्हाने आहेत. ते या दृष्टिकोनातून संबोधित केले जाईल.*

## २. DAY-NRLM मध्ये एकात्मिक शेती प्रभाग ची संकल्पना:

राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत वैविध्यपूर्ण उपजीविकेच्या उपक्रमांमध्ये सुधारणा, विस्तार व मूल्य साखळी विकसित करण्याचा उद्देशाने एकात्मिक शेती प्रभाग (IFC) प्रकल्प केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे DAY-NRLM अंतर्गत २ ते ३ जवळील गावांमधील २५०-३०० कुटुंबांचा समावेश करून एकात्मिक शेती प्रभाग प्रकल्पाची अंमलबजावणी करावी.

## ३. प्रकल्पाचे उद्देश:

- शेती, दुग्धव्यवसाय, शेळी, मेंढी पालन, कुक्कुटपालन, मत्स्यपालन, मधुमक्षीका पालन यांसारख्या उपजीविका उपक्रमांतर्गत राबविल्या जाणार आहे. या आंधारावर विशिष्ट शेती प्रणाली व मूल्य साखळी विकसीत करून महिला शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत करणे.
- तसेच सेंद्रिय शेती उपक्रमांतर्गत शेतातील कंपोस्ट, गांडूळ- कंपोस्ट इत्यादी तयार करून कचऱ्याचा पुनर्वापर करून सेंद्रिय उत्पादनांचा जास्तीत जास्त वापर करणे.
- उपजीविका उपक्रमांचे पर्यावरणावर होणारे नकारात्मक परिणाम कमी करणे.
- उत्पादन खर्च कमी करणे, जोखीम कमी करणे, उत्पादन आणि उत्पादकता वाढविण्यास मदत करणे.
- दर्जेदार उपजीविका सेवा सुनिश्चित करणे आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देणे यासाठी गुंतवणूकीस चालना देणे यासाठी समुदायाची क्षमता बांधणी करणे.
- अभियानातील लहान व सिमांत शेतकऱ्यांचे व्यक्तिगत उत्पादनांचे एकत्रितपणे गाव किंवा क्लस्टर स्तरावर लहान उत्पादकांच्या सामूहिक (उत्पादक गट) द्वारे एकत्रित करणे, ज्यामुळे प्राथमिक मूल्यवर्धन आणि बाजार जोडणीचा व्यवहार खर्च कमी होण्यास मदत होईल.
- छोटया उत्पादकांचे समूह एकत्रित आणून त्यांचे उत्पादक कंपनीत रूपांतर करून दुय्यम मूल्यवर्धन, प्रक्रिया, पॅकेजिंग, लेबलिंग आणि मार्केट लिंकेज करणे.

- गांव स्तरावर समान उत्पादन घेणाऱ्या महिला शेतकऱ्यांचे उत्पादक गट स्थापन केलेले असून त्यांच्या मार्फत कृषि निविष्ठा व उत्पादित मालाची एकत्रित खरेदी व विक्री करून प्राथमिक मूल्यवर्धन साखळी विकसित करून त्यांना बाजारपेठेशी संलग्न करने.

## ४. एकात्मिक शेती प्रभागाचे घटक:

**खालील एकात्मिक शेती प्रभागाचे विविध व्यापक घटक आहेत.**


- गाव स्तरावर प्राथमिक मुल्यवर्धन प्रक्रिया युनिटची उभारणी करणे.
- गाव स्तरावर प्राथमिक मुल्यवर्धन प्रक्रिया युनिटची उभारणीसाठी व इतर उपक्रमांसाठी निधी उपलब्ध करून देणे.
- IFC Block Anchor व समुदाय संसाधन व्यक्ती (CRPs), KVKS, ICAR द्वारे सुधारित उत्पादकता आणि उत्पादनाकडे नेणारी विस्तार सेवा (Extension सर्विस) विकसीत करणे
- बाजार प्रणाली -PG / PE, मूल्यवर्धन साखळी विकसित करून बाजार जोडणी करणे
- गाव स्तरावर महिलांना मार्गदर्शन व संसाधन उपलब्ध करून सेवेसाठी उपजीविका उपक्रम वृद्धी व संसाधन सेवा केंद्र (Livelihood Service Centre-LSC) विकसित करणे.
- शासनाचे विभाग व इतर संस्था यांचे सोबत कृतिसंगमातून तंत्रज्ञान, प्रशिक्षण, विपणन व्यवस्था विकसीत करणे.

**शेती व शेती आधारित उत्पादन जे एकात्मिक शेती प्रभाग अंतर्गत समाविष्ट केले जाऊ शकतात ते खालीलप्रमाणे आहेत (सूचनादायक):**

- पीकपद्धती- कृषि उपजीविका उपक्रम वृद्धी साठी उपक्रमात एकात्मिक शेती प्रभागांतर्गत मिश्र पीक पद्धती, आंतरपीक पद्धती, बहुस्तरीय पिक पद्धतीचा अवलंब करणे.
- शेतातील विविध पिके जसे की तृणधान्ये, कडधान्ये, तेलबिया, भाजीपाला, चारा, फुलशेती, फळबाग यांचा समावेश करणे
- **पशुधन विकास:**
    - गाव स्तरावर दुग्ध व्यवसाय, गाय-म्हैस पालन, शेळी-मेंढी पालन, परसातील कुक्कुटपालन, मत्स्य पालन या उपक्रमांमध्ये समाविष्ट शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरासाठी मार्गदर्शन करणे.
    - पशुधन अंतर्गत दुभती जनावरे यांच्या विकासासाठी तांत्रिक आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध करून देणे (उदा.- AI, milk cooling chamber)
    - पशूखादय निर्मितीस चालना देणे उदा.- सुधारित गोठा, मत्स्य शेतीत शेण व lime चा वापर करणे.
    - उत्पादित मालावर मुल्यवर्धन प्रक्रिया करणे. प्राथमिक प्रक्रिया यूनिट स्थापन करणे उदा.- दुग्ध संकलन केंद्र, दुग्धजन्य प्रक्रिया केंद्र, small cooling यूनिट, इ.
    - उत्पादित मालाची बाजार पेठेशी जोडणी करून देणे.
    - प्रशिक्षणाच्या माध्यमातून महिलांची क्षमता बांधणी करणे.
- **मत्स्य शेती:** विविध मत्स्यपालन आधारित उपजीविका उपक्रम शाश्वत उपजीविका मिळविण्यासाठी साठवणूक, तलाव व्यवस्थापन, कुक्कुटपालनासह मत्स्य तलावांचे एकत्रीकरण आणि तटबंदीवर फळे आणि भाजीपाला पिकवणे यासारख्या हस्तक्षेपांना अधिक जोर देणे आवश्यक आहे.
- **मधमाशी पालन:** मध गोळा करणे आणि मधमाशांचे संगोपन करणे.
- बायोगॅस आणि सीमा वृक्षारोपण, कंपोस्ट, गांडूळ खत यांसारख्या पुनर्वापराचे उपक्रम क्लस्टरमधील कृषी कचरा हा एकात्मिक शेती प्रभाग चा अविभाज्य भाग असेल

- **NTFPs:** रेशीम, लाख, औषधी वनस्पती, चिंच, लीफ प्लेट्स इ. उपक्रम राबविणेकरिता महिलांची क्षमता बांधणी करणे

५. अंमलबजावणी धोरण




५.१ कृतिसंगम:

- अभिसरण संधी एकमेकांना पूरक होण्यासाठी आणि एकात्मिक शेती क्लस्टर (एकात्मिक शेती प्रभाग) च्या प्रचारासाठी समन्वय घडवून आणण्यासाठी उपजीविकेच्या उपक्रमाशी संलग्न शासनाच्या विभागा सोबत काम करणे.
- भारतीय कृषी संशोधन परिषद (ICAR) आणि तिची संस्था- संशोधन केंद्रे जसे की कृषि विज्ञान केंद्र (KVK) एकात्मिक शेती प्रभागा च्या प्रचारात अतिशय सक्रिय आणि महत्त्वपूर्ण भूमिका बजावणार आहेत.
- कृषी विज्ञान केंद्रे (KVK), Integrated Farming System (IFS) ची ऑन-स्टेशन आणि ऑन-फार्म संशोधन केंद्रे आणि नॅशनल इनोव्हेशन्स इन क्लायमेट रेझिलिएंट अग्रीकल्चर (NICRA) सारख्या ICAR संशोधन केंद्रे/संस्थांसोबतचे सहकार्य चालू राहणे आणि सतत प्रशिक्षणासाठी आणखी सखोल मार्गदर्शनासाठी एकात्मिक शेती प्रभागाच्या विस्तारादरम्यान क्षमता वाढवणे विविध एकात्मिक शेती प्रणाली मॉडेल्सवर एक्सपोजर भेटी आणि सतत तांत्रिक सहाय्य मिळवणे.
- ICAR व्यतिरिक्त, भारत सरकारच्या विविध मंत्रालयांच्या इतर विविध योजना/संस्था आहेत ज्या एकात्मिक शेती प्रभाग च्या विस्तारासाठी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतील यासाठी समन्वय ठेवणे आवश्यक आहे.

५.२ त्रिपक्षीय नॉन-फायनान्शियल सामंजस्य करार (MoU) करण्यात आला आहे:

- भारतीय कृषी संशोधन परिषद, ग्रामीण विकास मंत्रालय आणि रॅपिड रुरल कम्युनिटी रिस्पॉन्स (RCRC - सिव्हिल सोसायटी ऑर्गनायझेशन्सचे एक संघ) यांनी त्रिपक्षीय नॉन-फायनान्शियल सामंजस्य करार (MoU) वर स्वाक्षरी केली.

- देशातील 100 जिल्ह्यांतील ग्रामीण भागात आर्थिक परिवर्तन घडवून आणण्याचे या सामंजस्य कराराचे उद्दिष्ट आहे. MSRLM ला 2 मार्च 2021 रोजी नॉन-फायनान्शियल त्रिपक्षीय सामंजस्य करारा प्रमाणे संस्थांसोबत समन्वय ठेऊन प्रकल्प अंमलबजावणी साठीची कार्यवाही करणेसाठी कार्यान्वित करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे प्राप्त झाली आहेत.

**५.२.१ KVK/ICAR ची IFC प्रकल्प अंमलबजावणीची भूमिका:**

- इंटरव्हेंशन व्हिलेज क्लस्टरमध्ये सुधारित तंत्रज्ञान आणणे
- सीआरपीला सतत प्रशिक्षण (इन-हाउस वैचारिक, क्षेत्रीय व्यावहारिक, एक्सपोजर भेट आणि नियोजित IFC प्रभागतील सर्व गावांमध्ये कृषि विज्ञान केंद्राद्वारे मार्गदर्शन) सह सुविधा देणे.
- KVK/ICAR विद्यमान प्रशिक्षण केंद्रात सुधारणा करेल आणि प्रत्येक क्लस्टरमधील एक गाव दत्तक घेईल आणि त्या क्लस्टरच्या इतर गावांसाठी सुधारित तंत्रज्ञान आणि पद्धतींसाठी या गावांना शिक्षण केंद्र म्हणून विकसित करेल.
- KVK तंत्रज्ञानाच्या प्रसारासाठी योग्य IEC साहित्य व प्रशिक्षण डेमो साइट किंवा मॉडेल विलेज/क्लस्टर विकसित करेल आणि प्रशिक्षण स्थानिक संदर्भावर आणि स्थानिक भाषेत आधारित असेल. KVK ज्ञान, क्षमता निर्माण आणि विस्तार भागीदार म्हणून अभियान IFC आंमलबाजावणीसाठी काम करेल

**५.२.२ MSRLM ची भूमिका:**

- महिलांचे एकात्मिक शेती प्रभागा मध्ये समावेशन करणे.
- आधुनिक शेती आणि संबंधित लागवड पद्धतींसाठी क्षमता निर्माण करणे.
- एकात्मिक शेती प्रभाग ब्लॉक अँकर आणि वरिष्ठ CRPs यांची जिल्हा स्तरीय निवड समिती मार्फत निवड करणे.
- मूल्यवर्धण साखळी विकसित करणेसाठी आणि फॉरवर्ड लिंकेजसाठी विद्यमान उत्पादक गटांना प्रशिक्षण देणे.
- पायाभूत सुविधा (उदा. प्रक्रिया युनिट्स, सीएचसी, सेंद्रिय निविष्ठा केंद्र, इ.) निर्माण करणे.
- लाइन डिपार्टमेंट सोबत कृतिसंगम करून IFC अंमलबजावणीसाठी सहकार्य घेऊन महिलांना लाभ मिळवून देणे.
- ब्रँडिंग, लेबलिंग आणि विपणन क्षमता वाढविणेसाठी महिला उत्पादक गटांना मदत व मार्गदर्शन करणे.

**५.२.३ Rapid Rural Community Response to COVID-19 (RCRC) ची भूमिका:**

- RCRC भागीदार Civil Society Organization (CSO) ची उपस्थिती असलेल्या तालुक्या मध्ये त्यांचे कार्यरत असलेले समर्पित, प्रशिक्षित उपजीविका कर्मचारी IFC अंमलबजावणीसाठीचे काम पाहतील.
- RCRC प्रत्येक जिल्ह्यात आपला एक प्रतिनिधि शेती व शेती आधारित कार्यक्रमावर काम करतील आणि स्वतःचे एकत्रीकरण, मूल्यवर्धन आणि विपणन व्यवस्था स्थापन करतील.
- NRLM/SRLM/RCRC हे ज्ञान व्यवस्थापन करतील.

**५.२.३.१ CSO भागीदार संस्थांची यादी**

सद्यस्थितीत NRETP प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या IFC प्रकल्प अंमलबजावणी साठी खाली दिलेल्या स्थानिक यंत्रणेला मदत करतात.

| अ. क्र. | CSO भागीदार संस्थांचे नाव | जिल्ह्याचे नाव | तालुक्याचे नाव | आयएफसी प्रभागा संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | फाऊंडेशन फॉर इकॉलॉजीकल security (FES) | यवतमाळ | घाटंजी | ४ |
| २ | Cohesion फाऊंडेशन ट्रस्ट | उस्मानाबाद | तुळजापूर | ३ |
| ३ | वॉटरशेड ऑर्गनाइझेशन ट्रस्ट (WOTR) | जालना | भोकरदन | ३ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | प्रगती अभियान | नाशिक | त्रिंबकेश्वर | ३ |

याप्रकारे आपण आपल्या जिल्ह्यात प्रस्तावित तालुक्यांमध्ये IFC प्रकल्प उद्धीष्ट पूर्ती करण्यास मदत करतील अशा स्थानिक CSO संस्थाची नावे राज्य कक्षास सादर करावी. जेणे करून राज्य कक्ष व RCRC संस्था यांच्याकडून संबंधित संस्थांशी संपर्क साधून पुढील कामाचे नियोजन करण्यास मदत होईल.

### ५.४ प्रभाग स्तरावर उपजीविका उपक्रम वृद्धी व संसाधन सेवा केंद्र (LSC)

- IFC प्रकल्पांतर्गत सामाजिक समाविष्ट असणाऱ्या गावातील सर्व सदस्यांसाठी त्यांचे उपजीविका उपक्रमात आवश्यक असणारे तांत्रिक ज्ञान, मार्गदर्शनासाठी तसेच विविध प्रकारच्या सुविधा, निविष्ठा आणि सेवा देण्यासाठी सर्व समावेशक असे सुसज्ज सुविधा केंद्र प्रभाग स्तरावर स्थापन केले जातील.

- उपजीविका उपक्रम वृद्धी व संसाधन सेवा केंद्र (Livelihood Service Centre –LSC) स्थापन करण्याचे उद्धीष्ट हे एकात्मिक शेती प्रभाग स्तरावर ३०० लाभार्थी महिला व यासोबतच इतर शेतकरी यांना प्रभाग स्तरावर शेती व शेती आधारित उपक्रम, पशुपालन उपक्रम याकरिता मूल्यवर्धन साखळी तयार करणे असे आहे.

- उपजीविका उपक्रम वृद्धी व संसाधन सेवा केंद्र एक वन स्टॉप सुविधा केंद्र म्हणून काम करेल, कारण ते नवीन तंत्रज्ञान, प्रशिक्षण आणि क्षमता बांधणी, निविष्ठा, अद्ययावत शेती यंत्रसामग्री, पशुधन आरोग्य व्यवस्थापनासाठी पशुवैद्यकीय सेवा, सुधारित संगोपन पद्धती, मातीचे आरोग्य आणि पाणी वापर कार्यक्षमता सुधारण्यासाठी सेवा प्रदान करेल.

#### ५.४.१ उपजीविका उपक्रम वृद्धी व संसाधन सेवा केंद्र (LSC) फायदे:

- उपजीविका उपक्रम वृद्धी व संसाधन सेवा केंद्रा मुळे लाभार्थींचे ऑपरेशनल कॉस्ट 15% ने कमी होण्यास मदत होईल (transportation cost, processing services, better price realization, etc)

- कुटुंबास गांव स्तरावर उत्तम दर्जाचे उपलब्ध उपक्रमांसाठी आवश्यक असणारे मार्गदर्शन व उपक्रम निहाय त्यासाठी लागणारी संसाधन उपलब्ध होतील.

- उपजीविका सेवा केंद्राच्या माध्यमातून क्लस्टर स्तरावर इनपुट आणि सेवा वितरण यंत्रणेचे नेटवर्क विकसित होईल.


- शेती उपयोगी यंत्रणे भाड्याने आणि इतर संबंधित कृषी आणि संलग्न सेवांचा लाभ होईल

- गाव आणि क्लस्टर स्तरावरील सर्व प्रशिक्षण उपजीविका सेवा केंद्रात आयोजित केले जातील. वरिष्ठ CRPs, ग्रामस्तरीय CRPs आणि महिला किसान यांची क्षमता बांधणी उपजीविका उपक्रम वृद्धी व संसाधन सेवा केंद्र मध्ये केली जाईल.

#### ५.४.२ उपजीविका उपक्रम वृद्धी व संसाधन सेवा केंद्राचे व्यवस्थापन:

- उपजीविका उपक्रम वृद्धी व संसाधन सेवा केंद्राचे व्यवस्थापन Senior CRP, IFC block anchor मार्फत केले जाईल.

ग्रामविकास व पंचायती राज विभाग, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष




६. एकात्मिक शेती प्रभाग च्या मालमत्तेची मालकी आणि प्रशासन:

- गावातील VO आणि क्लस्टर स्तरावर CLF नियामक मंडळ म्हणून काम करेल.
- VO आणि CLF प्रकल्पाच्या निधीचा वापर आणि प्रगती यावर लक्ष ठेवतील.
- VO आणि CLF एकात्मिक शेती प्रभाग अंतर्गत व्यावसायिक उपक्रम सुरळीत चालवण्यासाठी वेळोवेळी तपासणी व मार्गदर्शन करतील.
- एकात्मिक शेती प्रभाग मध्ये तयार केलेली मालमत्ता (डाळ मिल, राईस मिल) ही IFC प्रभाग ज्या CLF-प्रभाग संघाच्या अंतर्गत येतो त्या प्रभाग संघास मालकी द्यावी.
- सर्व प्रकारच्या खरेदीसाठी CBOs-CLF, VO, FPO, PG, SHG द्वारे सामुदायिक खरेदी मार्गदर्शक तत्त्वांचे पालन केले जाईल

७. प्रकल्पाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक मनुष्यबळ रचना:

१. क्लस्टर स्तरावर १ उपजीविका वरिष्ठ CRP (Senior CRP)

२. तालुका स्तरावर १ IFC Block Anchor

- उपरोक्त दोनही समुदाय संसाधन व्यक्तींची निवड झाल्यावर तीन वर्ष या प्रकल्प कालावधिपर्यंत अनुज्ञेय मानधन देय राहील
- निवड झालेल्या समुदाय संसाधन व्यक्ती मूळ पदाचा कारभार सांभाळून एकात्मिक शेती प्रभागाचे ही काम पहिल.
- प्रकल्प संपल्यानंतर समुदाय संसाधन व्यक्ति आपल्या मूळ पदावर काम पाहिल व अभियांनातील धोरणा नुसार अनुज्ञेय मानधन देण्यात येईल.
- निवड केलेल्या समुदाय संसाधन व्यक्ती कडून सोबत जोडलेल्या परिशिष्ट १- समंती पत्र कार्यालयात जमा करण्यात आल्या नंतरच समुदाय संसाधन व्यक्तींनी त्यांच्या कार्यक्षेत्रात काम करण्यास सुरुवात करण्यात यावी.

ग्रामविकास व पंचायती राज विभाग, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष

७.१ Senior CRP

७.१.१ Senior CRP साठी निवड निकष:

- किमान १२ वी पास असलेले किंवा – जिथे १२ वी पास नसतील तिथे स्थानिक परिस्थिति नुसार अट शिथील करण्याचे अधिकार समितीस राहतील
- समुदाय संसाधन व्यक्ति ही कार्यक्षेत्रातील उपजीविका सखी- उदा.- कृषि सखी, पशू सखी, M-CRP (कृषि), उद्योग सखी, वन सखी इ. मध्ये कार्य करणारी असावी.
- अभियानात समुदाय संसाधन व्यक्ति म्हणून काम केल्याचा किमान ३ वर्षांचा अनुभव असावा व त्यानुसार प्राधान्य क्रम द्यावा
- समुदाय संसाधन व्यक्तिकडे ३-४ शेती व शेती आधारित उपजीविके चे स्रोत असले पाहिजेत व त्या संबंधित तांत्रिक ज्ञान अवगत असावे.
- विविध ३-५ गावात काम करण्याची तयारी असावी.
- वार्षिक उत्पन्न किमान ७५,००० वर असावे
- निवासी प्रशिक्षणास उपस्थित राहण्याची तयारी असावी
- उत्तम संवाद कौशल्य आणि समुदायाला सुलभ रीतीने समजावून सांगता येणे
- ग्राम संघ व उत्पादक गटाचे लेखे लिहिण्याचा अनुभव असावा
- मार्केटिंग ॲक्टिविटी करिता काम पाहण्याची तयारी असावी

७.१.२ वरिष्ठ (Senior) CRP ची भूमिका आणि जबाबदाऱ्या:

- CRP च्या क्लस्टरमधील गावपातळीवरील उपजीविका CRPs द्वारे प्रशिक्षण देणे आणि अंमलबजावणीला सहकार्य करण्याची प्राथमिक जबाबदारी असेल
- उपजीविका उपक्रम वृद्धी व संसाधन सेवा केंद्राचे चे व्यवस्थापन पाहणे
- उपजीविका CRPs च्या माध्यमातून एकात्मिक शेती प्रभागात प्रस्तावित उपक्रमातून जास्तीत जास्त शेतकरी यांच्या पर्यन्त सेवा पुरविणे.
- IFC प्रभागाच्या सूक्ष्म नियोजन आराखडा अनुसार, हंगामापूर्वी शेतकऱ्यांची उपक्रम निहाय माहिती जमा करणे, त्याबद्दलचा अहवाल CLF व LSC कार्यकारिणी समितिच्या समोर सादर करणे.
- एकात्मिक शेती प्रभागाचे लेखे नियमित अद्ययावत राखणे
- उत्पादनाच्या मार्केटिंग करण्यासाठी प्रभागाला मदत करणे
- प्रभागतील महिलांच्या उपक्रमांना (शेतातील पिके, शेती आधारित उपक्रम) यांना प्रत्येक्ष भेट देऊन कामाचा आढावा घेणे व आवश्यक मार्गदर्शन करणे
- गरजेनुसार प्रशिक्षणाचे नियोजन करून अहवाल IFC block anchor व LSC कार्यकारिणी समिति समोर सादर करणे
- अद्यायवत MIS राखणे
- दरमहा केलेल्या कामाचा अहवाल IFC block anchor व LSC कार्यकारिणी समिति समोर सादर करणे.
- प्रभागातील VO सह समन्वयाने काम करणे

७.१.३ वरिष्ठ (Senior) CRP मानधन:

- प्रवास देयकासह दरमहा कमाल मानधन रुपये ६०००/- इतके आहे.
- निश्चित मासिक प्रवास देयक रुपये १५००/- इतके समविष्ट राहील व सोबत देण्यात आलेल्या मूल्यमापन अहवाल नुसार मासिक मानधन अदा करण्यात येईल.
- वरिष्ठ CRP यांचे मानधन एकात्मिक शेती प्रभाग संघाची मालकी दिलेल्या प्रभाग संघातून करण्यात येईल.



ग्रामविकास व पंचायत राज विभाग

७.१. ४ वरिष्ठ CRP पदाचे निवड पद्धती:

- एकात्मिक शेती प्रभाग तालुका अँकर, सीनियर CRP यांची निवड संबंधित प्रभाग संघ यांच्या मार्फत करण्यात यावी व संबंधित प्रभाग संघ समुदाय संसाधन व्यक्तींना रुजू करून घेतील.
- संबंधित प्रभाग संघ निवड केलेल्या वरिष्ठ CRP यांचा ११ महिन्यांचा करार करार करतील व त्यांच्या कामाचे मूल्यमापन प्रभाग संघ करेल, प्रगती समाधान कारक असल्यास १ दिवसाचा खंड देऊन पुढील मुदत वाढ मिळेल.
- वरिष्ठ CRP यांचा कालावधी तीन वर्ष/प्रकल्प कालावधी पर्यन्त मर्यादित राहतील. त्यांनंतर पद आपोआप रद्द होईल व त्यांना IFC प्रकल्पातील मानधन देय राहणार नाही.
- वरिष्ठ समुदाय संसाधन व्यक्तीचे (Senior CRP) यांची निवड कार्यरत असलेल्या CRP मधून केली असल्याने, त्यांचे मानधन एकाच प्रकल्पा द्वारे काढण्यात येईल याची दक्षता घ्यावी

७.१.५ **लेखी व तोंडी परीक्षेचे निकष:**

- लेखी परीक्षेची पातळी १२ वी राहील.
- लेखी परीक्षेत कृषि व कृषि संलग्न विषयी ५०% प्रश्न असावेत.
- लेखी परीक्षा किमान ४० गुणांची असावी.
- तोंडी परीक्षा ही १० गुणांची असावी. तोंडी परीक्षेमध्ये संबंधित व्यक्तींचे संवाद कौशल्य, कामाचा अनुभव, प्रात्यक्षिक अनुभव यांसारख्या बाबींच्या आधारावर गुणांकण करण्यात यावे.
- लेखी व तोंडी परीक्षेचे गुण एकत्रित करून जास्तीतजास्त गुण प्राप्त केलेल्या व्यक्तींची निवड करण्यात यावी.

७.२ **IFC Block Anchor:**

७.२.१ **IFC Block Anchor** साठी निवड निकष:

- शिक्षण- किमान कृषि व कृषि संलग्न पदवी जसे की कृषि तंत्रज्ञान, Bachelor of Science in Agriculture or Bachelor of Science in Horticulture or B. Tech. in Agriculture or Bachelor of Science in Fishery, Bachelor of Science in Forestry, Bachelor of Veterinary Science and Bachelor of Science in Animal Husbandry, Bachelor of Business Administration पदवी धारक असणे अवश्यक आहे.
- अनुभव- संबंधित व्यक्ति पदवी धारक असल्यास १ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.
- एकात्मिक शेती प्रभाग तालुका अँकर सेवादाता स्थानिक स्तरावरील असल्यास प्राधान्य द्यावे.
- वय- कमाल वय ४३ वर्ष असावे
- कृषी, फलोत्पादन, मत्स्यपालन, पशुपालन, मधमाशी पालन इत्यादी क्षेत्रात प्रगतीशील शेतकरी असू शकते, म्हणजेच शेती व शेती आधारित उपक्रम याबाबत माहिती असली पाहिजे.
- उत्तम संवाद कौशल्य असणे आवश्यक आहे व सामुदायाला सुलभ रीतीने समजावून सांगता यावे.
- शेती व शेती आधारित मूल्यवर्धन साखळी उपक्रम अंमलबाजवणी बद्दल माहिती असणे आवश्यक आहे.
- तांत्रिक ज्ञान- संगणकीय ज्ञान असणे आवश्यक आहे.
- सदर IFC block anchor तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष यांच्या आधीनस्त राहून त्यांच्या समन्वयाने कामकाज पाहतील.

७.२.२ **IFC Block Anchor ची भूमिका आणि जबाबदाऱ्या:**

- प्रभागतील वरिष्ठ CRP इतर समुदाय संसाधन व्यक्ती यांच्याशी नियमित समन्वय साधून प्रभागाचे कामाचे नियोजन करावे.

- CRP यांच्याकडून प्रभगातील मूलभूत सर्वेक्षण करून, मिळालेल्या माहितीच्या आधारावर सूक्ष्म नियोजन अरखडा तयार करावा.
- गावपातळीवर सूक्ष्म नियोजन आराखडा नुसार प्रकल्पाची अंमलबजावणीची संपूर्ण जबाबदारी राहील.
- प्रभाग स्तरावर प्रकल्पाचे निरीक्षण आणि मूल्यमापन करून सदरचा अहवाल LSC कार्यकारिणी समिती, जिल्हा व तालुका अभियान कक्षास अहवाल सादर करावा.
- वरिष्ठ CRP यांचा कामाचा आढावा घेऊन, त्यांना पुढील कामाचे नियोजन द्यावे.
- प्रभागतील महिलांच्या उपक्रमांना (शेतातील पिके, शेती आधारित उपक्रम) यांना प्रत्यक्ष भेट देऊन कामाचा आढावा घेणे व आवश्यक मार्गदर्शन करणे.
- आपल्या प्रभागाचा मासिक कृती आराखडा तयार करून आराखडा प्रमाणे कामे होणे अनिवार्य राहील. तसेच सदर कामाचा अहवाल तालुका व्यवस्थापक, जिल्हा व्यवस्थापक- उपजीविका यांना दरमहा सादर करावा.
- प्रभागातील प्रस्तावित उपक्रमांचे प्रस्ताव तालुका व्यवस्थापक, जिल्हा व्यवस्थापक- उपजीविका, व संबधित व्यक्तींच्या मदतीने तयार करावे
- प्रभाग निहाय Product development करून त्याची packaging व ब्रंडिंग व संबंधित मार्केटिंग ॲक्टिविटी करिता काम पाहणे आवश्यक राहील. यासाठी तालुका व्यवस्थापक व जिल्हा व्यवस्थापक- विपणन यांच्या मार्गदर्शनाने अंमलबजावणी करावी.
- LSC चे व्यवस्थापन करणे, तसेच उपक्रम निहाय लेखे व बैठकीचे इतिवृत्त अदयावत ठेवणे आणि वैविध्यपूर्ण उपक्रमांची अंमलबजावणी करणे
- प्रभागामधील विविध प्रक्रिया यूनिट (processing unit), एकत्रीकरण सेंटर (Collection Centre), निविष्ठा यांची नियमित देखरेख करणे तसेच महिलांना तांत्रिक सहाय्य करणे.
- LSC च्या कामाच्या प्रगतीचा आढावा घेणे
- अद्यायवत प्रगतीचा MIS राखणे
- नियमित तालुका व्यवस्थापन कक्ष व जिल्हा अभियान कक्षाला कामाचा तपशील सादर करणे अनिवार्य असेल.

**७.२.३ IFC Block Anchor (सेवादाता) मानधन:**

- प्रवास देयकासह दरमहा कमाल मानधन रुपये २०,०००/- इतके आहे.
- निश्चित मासिक प्रवास देयक रुपये २५००/- इतके राहील व सोबत देण्यात आलेल्या मूल्यमापन अहवाल नुसार मासिक मानधन अदा करण्यात येईल.
- IFC Block Anchor निवड व मानधन वितरित करण्याकरिता तालुक्यातील IFC प्रकल्पांतर्गत येणाऱ्या व खालील बाबींची पूर्तता करणाऱ्या एका प्रभाग संघाची निवड करण्यात यावी-
    - आदर्श प्रभाग संघ (MCLF) असल्यास प्राधान्य देण्यात यावे.
    - संबंधित प्रभाग संघापैकी जो प्रभाग संघ जुना आहे त्यास प्राधान्य देण्यात यावे.
    - ज्या प्रभाग संघामार्फत जास्तीत जास्त CIF निधी वितरण व नियमित परतपेढ करण्यात आलेली आहे.
    - नियमित समुदाय संसाधन व्यक्तींचे मानधन वितरित करण्यात येते.
    - त्रैमासिक व वार्षिक सर्वसाधारण सभा यामधील समूहातील महिलांचा सक्रिय सहभाग
    - प्रभाग संघाची कार्यकारी समिती व उपजीविका समिती प्रभावीपणे काम करणारी असावी.

**७.२.४ IFC Block Anchor सेवादाता पदाचे निवड पद्धती:**

- एकात्मिक शेती प्रभाग तालुका अँकर (IFC Block Anchor) सेवादाता यांची निवड संबंधित प्रभाग संघाच्या माध्यमातून करण्यात यावी व संबंधित प्रभाग संघ समुदाय संसाधन व्यक्तींना रुजू करून घेतील.
- IFC Block Anchor सेवादाता हे पद तीन वर्षपर्यन्त/प्रकल्प कालमर्यादित राहील, त्यानंतर सदर पद आपोआप रद्द होईल व त्यांना कोणतेही मानधन देय राहणार नाही.

- संबंधित प्रभाग संघ निवड केलेल्या IFC Block Anchor यांचा ११ महिन्यांचा करार करार करतील व त्यांच्या कामाचे मूल्यमापन प्रभाग संघ करेल, प्रगती समाधान कारक असल्यास १ दिवसाचा खंड देऊन पुढील मुदत वाढ मिळेल.
- संगणकिय सर्टिफिकेट कोर्स प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.
- सदर पद हे सेवादाता म्हणून काम पाहतील.

**७.२.५ लेखी व तोंडी परीक्षेचे निकष:**

- लेखी परीक्षेची काठिण्य पातळी डिप्लोमा राहील
- लेखी परीक्षेचे विषय व गुणाकंण पुढील प्रमाणे राहील-
  - बुद्धिमत्ता चाचणी- ५ गुण
  - गणित- ५ गुण
  - कृषि व कृषि संलग्न -३० गुण
- सदर परीक्षा ही बहुपर्यायी असेल.
- तोंडी परीक्षा ही १० गुणांची असावी. तोंडी परीक्षेमध्ये संबंधित व्यक्तींचे संवाद कौशल्य, कामाचा अनुभव, प्रात्यक्षिक अनुभव यांसारख्या बाबींच्या आधारावर गुणांकण करण्यात यावे.
- लेखी व तोंडी परीक्षेचे गुण एकत्रित करून जास्तीतजास्त गुण प्राप्त केलेल्या व्यक्तींची निवड करण्यात यावी.

**८. एकात्मिक शेती प्रभाग IFC Block Anchor व समुदाय संसाधन व्यक्ति प्रभाग स्तरीय निवड समिती:**

- अध्यक्ष- प्रभाग संघाचे अध्यक्ष
- सदस्य- प्रभाग संघाचे उपाध्यक्षक
- सदस्य- प्रभाग संघाचे सचिव
- सदस्य सचिव- जिल्हा अभियान व्यवस्थापक
- सदस्य - जिल्हा व्यवस्थापक- उपजीविका
- सदस्य – जिल्हा व्यवस्थापक- विपणन
- सदस्य- तालुका अभियान व्यवस्थापक

**प्रभाग स्तरीय निवड समितीची कार्य:**

- प्रभाग स्तरिय समिती गठित करण्याची जबाबदारी जिल्हा अभियान व्यवस्थापक यांची असेल.
- जिल्हा अभियान व्यवस्थापण कक्षावरून सदर पदांची जाहिरात किमान दोन 'अ' दर्जाच्या स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्ध करणे.
- यासोबत पंचायत समिती व विविध ऑनलाइन social मीडिया याच्या माध्यमातून प्रसिद्धी करावी.
- जिल्ह्यातील सर्व प्रभाग संघांना पात्र सदस्यांना अर्ज भरणे बाबत कळविणे.
- आलेल्या अर्जाची छाननी करून, पात्र अर्ज असलेल्या सदस्यांची लेखी व तोंडी परीक्षा घेऊन निवड करणे.
- लेखी व तोंडी परीक्षे नंतर गुणानुक्रमे अंतिम झालेल्या निवड व प्रतीक्षा यादिस संबंधित प्रभाग संघाची मान्यता घेण्यात यावी व निवड झालेल्या उमेदवारास प्रभाग संघाने कार्यादेश द्यावा. प्रभाग संघाचा निर्णय हा अंतिम राहील.
- निवड प्रक्रिया राबविण्याची सर्व कार्यवाही जिल्हा व तालुका कक्षा मार्फत राबविण्यात यावी व प्रभाग संघास सारतोपरी मार्गदर्शन/ मदत करावी.

- IFC block anchor सेवादाता यांच्या सेवा IFC प्रकल्प कालावधी पर्यंतच मर्यादित असून, उमेदवारास कुठल्याही शासकीय सेवेवर हक्क सांगता येणार नाही.
- उमेदवारास कार्यादेश देतेवेळेस उमेदवारांकडून कुठल्याही शासकीय सेवेवर हक्क सांगता येणार नसल्याचे संमती पत्र घेण्यात यावे.
- निवड झालेल्या सदस्यांच्या यादीस निवड समिती ची मान्यता घेऊन सदस्यांना त्यांच्या संबंधित कार्यक्षेत्रात काम करण्यासाठीची परवानगी देणे.
- वरिष्ठ CRP व IFC Block Anchor सेवादाता या पदांची जाहिरात प्रसिद्धी तसेच निवड प्रक्रिया राबवित असतांना येणारा खर्च हा DPR बनविण्याकरिता दिलेल्या आर्थिक तरतूद यातुन खर्च करावा.
- सदर पदांची निवड प्रक्रिया ३० ऑगस्ट २०२३ पर्यन्त पूर्ण करावी.

९. एकात्मिक शेती प्रभाग अंमलबजावणी मूल्यमापन व संनियंत्रण समिति:

**जिल्हा स्तरावर:**

- प्रकल्प संचालक यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा अभियान व्यवस्थापक, जिल्हा व्यवस्थापक– उपजीविका, जिल्हा व्यवस्थापक– विपणन, जिल्हा अभियान –MIS, संबंधित तालुक्याचे तालुका अभियान व्यवस्थापक (सदस्य सचिव) व १ मॉडेल प्रभाग संघाचे प्रतिनिधि सदस्य यांची संनियंत्रण समिती गठित करण्यात यावी.
- जिल्हा अभियान व्यवस्थापक, जिल्हा अभियान – उपजीविका, जिल्हा अभियान –MIS, यांच्या उपस्थितीत संबंधित तालुक्याचे तालुका अभियान व्यवस्थापक व १ मॉडेल प्रभाग संघाचे प्रतिनिधि सदस्य, सर्व प्रभाग समन्वयक (CC), सर्व तालुका अँकर, व वरिष्ठ समुदाय संसादन व्यक्ति यांची मासिक आढावा बैठक घेऊन प्रकल्प अंमलबजावणीचे मूल्यमापन व संनीयत्रण करणे.
- बैठकीचा आढावा अहवाल नियमित राज्य कक्षास सादर करणे बंधनकारक असेल. प्रकल्पा अंतर्गत घेतल्या जाणाऱ्या सर्व प्रकारच्या बैठकींच्या इतिवृत्ताची स्वतंत्र फाइल जिल्हा कक्षाकडे असावी.

**तालुका स्तरावर:**

- गट विकास अधिकारी, प. स. यांच्या अध्यक्षतेखाली तालुका अभियान व्यवस्थापक, तालुका व्यवस्थापन- MIS, प्रभाग समन्वयक, सर्व तालुका अँकर सेवादाता, व वरिष्ठ समुदाय संसादन व्यक्ति यांची मासिक आढावा बैठक घेऊन आवश्यक सूचना देवून प्रकल्प अंमलबजावणीचे मूल्यमापन व संनियंत्रण करणे व त्यांचा दरमहा अहवाल जिल्हा अभियान व्यवस्थापक कक्षाला सादर करणे बंधनकारक असेल.
- सदरच्या सर्व बैठकींच्या इतिवृत्ताची स्वतंत्र फाइल जिल्हा कक्षाकडे असावी.

# परिशिष्ट-१

## संमती पत्र

मी (महिलेचे नाव) राहणार गांव- मधील रहिवाशी असून (स्वयं सहाय्यता समूहाचे नाव) या स्वयं सहाय्यता समूहाची सदस्य असून (ग्रामसंघ/प्रभाग संघ्याचे नाव) या ग्रामसंघ/प्रभाग संघ अंतर्गत अभियानात दिनांक- 00/00/0000 पासून या पदावर कार्यरत आहे. तरी एकात्मिक शेती प्रभाग विकास (IFC) प्रकल्प अंतर्गत उपजीविका वरिष्ठ CRP समुदाय संसाधन व्यक्ति म्हणून काम करण्यासाठी ईच्छुक आहे. सदरच्या प्रकल्पाच्या कालावधीत मी पदावर काम करीत असतांना माझ्या मूळ पदाचे देखील काम करेन. मी फक्त IFC प्रकल्पातील मानधन रक्कम घेण्यास पात्र असेल. यासाठी मी समंती पत्र स्वेच्छेने लिहून देत आहे.

कळावे,

नाव -

स्वाक्षरी-

दिनांक-